नि.दि.दावा नं. १२२/२०२३

नारायण विरुध्द अविनाश

## नि.क्र. ३२ वरील आदेश

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामधील व निशाणी ५ चे अर्जामध्ये दाव्याचे वर्णनामधील चतु:सिमेमध्ये दुरुस्ती करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप, निरंतर मनाई व डिक्लेरेशनसाठी दाखल केला आहे. सदरचा दावा तुर्तातूर्त ताकीद अर्जाचे चौकशीकरिता प्रलंबीत आहे. दावा कलम १ मध्ये व तुर्तातूर्त ताकीद अर्जाचे कलम १ मध्ये दावा मिळकतीच्या चतु:सिमा नमूद करताना नजरचुकीने व अनावधानाने टायपिंग मिस्टेक होवून दक्षिणेच्या ठिकाणी उत्तर व उत्तरेच्या ठिकाणी दक्षिण दिशा अशा प्रकारे चुकून नमूद झालेल्या असून त्या दाव्यामध्ये व निशाणी ५ चे अर्जामध्ये दुरुस्ती करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

३. प्रतिवादीतर्फे नि.क्र. ३३ वर वादींचे अर्जास त्यांचे म्हणणे देवून अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा असून त्यांनी तो नाकरलेला आहे. वादींनी दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीच्या चतु:सिमा पुर्णत: चुकीच्या व बेकायदेशीर नमुद केलेल्या असल्यामुळे वादीचा दावा चुकीचा व बेकायदेशीर आहे. वादींना चुकीच्या चतु:सिमेतील मिळकतीबाबत कोणतीही दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. वादीने दाव्याचे काम लांबणीवर टाकण्याचे हेतूने प्रस्तुत दावा दुरुस्तीचा अर्ज दिला असून तो नामंजूर करणेत यावा व वादीला जास्तीत जास्त कॉस्ट करणेची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. वादीतर्फे प्रस्तुत अर्जात नमूद दुरुस्ती ही केवळ तांत्रीक स्वरुपाची असून ती मंजूर केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही. वादी व

प्रतिवादी यांच्यातील वाद विषयाचे अवलोकन केल्यानंतर अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य राहील. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या तसेच निशाणी ५ चे अर्जाचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. उलट दावा गुणावगुणांवर चालण्यास मदत होणार आहे. सबब, वादींचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा अर्ज नि.क्र. ३२ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी दाव्यामध्ये तसेच निशाणी ५ मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे मुदतीत दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची व निशाणी ५ चे अर्जाची प्रत दाखल करावी.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2024.03.18 17:56:52 +0530

शिराळा
दिनांक १८/०३/२०२४

**(श्रीमती व्ही. ए. देसाई)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
शिराळा

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 18/03/2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 18/03/2024 |
| Judgment uploaded on | : | 19/03/2024 |